# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १०१५/२०२३**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. स्वप्नील विनोदराव साळवे, व्दारा- मनोज धात्रक, मेहेर नगर, मारोती भाऊ समाधी जवळ, सिंधी मेघे, वर्धा, जि. वर्धा-४४२००१ | उपविभागीय पोलीस अधिकारी, पुलगांव, ता. देवळी जि. वर्धा | अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, वर्धा, ता.जि. वर्धा |

**सुनावणी दिनांक :- ०५.०१.२०२६**

**१. उपस्थिती —**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित (प्रतिनिधी)** | **अनुपस्थित** | **उपस्थित (प्रतिनिधी)** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज —**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ११.०४.२०२३

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १२.०४.२०२३

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : दिलेली माहिती दिशाभूल करणारी असल्यामुळे व असमाधानकारक व एकाच अर्जामध्ये दोन आदेश दिल्यामुळे.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केली आहे.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १७.०१.२०२३

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १९.०१.२०२३

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : कालावधी नमूद केला नाही.

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : १) दिनांक १ जानेवारी २००७ ते ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत पोलीस स्टेशन, पुलगांव येथे ५१ आर्थिक बाबींसंबंधी/पैश्यांच्या संबंधी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत (माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिलेल्या माहितीनुसार) त्या सर्व प्राप्त ५१ तक्रारींवर FIR दाखल करण्यात आले आहेत, त्या सर्व ५१ तक्रारींच्या प्रती व FIR च्या प्रती देण्यात याव्या. २) या सर्व ५१ तक्रारीमध्ये (आर्थीक

बाबीसंबंधी/पैश्यांच्या संबंधी तक्रारी) किती तक्रारींबाबत जिल्हा शासकीय अभियोक्ता यांचा अभिप्राय घेण्यात आला आणि जिल्हा शासकीय अभियोक्ता यांच्या सल्ल्यानुसार FIR दाखल करण्यात आले, याबाबत माहिती देण्यात यावी.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग पुलगांव यांनी दिनांक ०६.०३.२०२३ रोजी सहा. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पो.स्टे. पुलगांव यांचेकडून प्राप्त झालेली माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. त्यात मुद्दा क्र. १ बाबत सदर माहिती ही महाराष्ट्र पोलीस दलाचे अधिकृत वेब साईडवर उपलब्ध आहे. तसेच मुद्दा क्र. २ बाबत एफ.आय.आर. चे अपराध क्रमांक न दिल्यामुळे कुठली माहिती द्यावी, हा बोध होत नाही, असे नमूद केले आहे.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २१.०२.२०२३

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही.

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळालेली नाही.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, वर्धा यांनी दिनांक १३.०३.२०२३ रोजी सुनावणी घेवून दिनांक ३०.०३.२०२३ अन्वये आदेश पारीत केले आहे. त्यात अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही दिर्घकालीन व विस्तृत स्वरुपाची असल्याने सदरची माहिती पुरविण्यास प्रमाणापेक्षा जास्त व व्यापक मनुष्यबळ, कालावधी लागणार आहे. त्यामुळे अपिलार्थी हे पो.स्टे. ला प्रत्यक्ष उपस्थित राहिल्यास त्यांना अभिलेख पडताळणीस देण्यात यावा, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

१. आज सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेतर्फे श्री. शिवराज मा. कदम, पोलीस उपनिरीक्षक उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थीस अवलोकन करण्यासाठी बोलविण्यात आले होते. परंतु अपिलार्थी हे अवलोकन करण्यासाठी आलेले नाही, त्यामुळे त्यांना माहिती देण्यात आली नाही.

२. त्यावर उपस्थित अपिलार्थी यांनी नमूद केले की, प्रथम अपिलीय आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अवलोकन करण्यासाठी बोलविले होते. अवलोकन करण्यासाठी विहीत मुदतीत बोलविले नसल्यामुळे सदर माहिती ही विनामुल्य पुरविणे अपेक्षित आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी ५१ तक्रारीच्या प्रती उपलब्ध असल्याचे नमूद केले होते. त्यामुळे ५१ प्रती देणे अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी हे दिशाभूल करीत आहे. त्यामुळे त्यांना माहिती देण्याबाबत आदेशित करावे.

६. निष्कर्ष —

१. सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने रेकॉर्डवर उपलब्ध असलेली माहिती पुरविणे अपेक्षित ठरते.

२. सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब केलेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का लादण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांचेकडून मागविणे अपेक्षित आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## अंतरिम आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, पुलगांव, ता. देवळी जि. वर्धा यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती जी रेकॉर्डवर उपलब्ध आहे, ती संपुर्ण माहिती सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसांत अपिलार्थीस विनामुल्य पुरविण्यात यावी.

२. श्री. गोकुळसिंग पाटील, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, पुलगांव, ता. देवळी जि. वर्धा यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का लादण्यात येवू नये, याचा लेखी खुलासा त्यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात आयोगास व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही, तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पोहचेल, याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

३. वरील निर्देशासह, प्रस्तुतचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर (stamp)

GNimdeo

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : ०५.०१.२०२६

13 FEB 2026

जावक क्रमांक 9968 दिनांक